# निर्लेखीत झालेली यंत्रे व उपकरणे यांचा लिलाव करणे करीता खालील प्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील.

१. यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य यांच्या खरेदी करण्या करीताचा निविदा फॉर्मचा नमुना या कार्यालयामधील स्टेशनरी विभागात रु.२,०००/- प्रती फॉर्म ( ना परतावा रक्कम ) कार्यालयीन वेळेत दि.२८/०४/२०२३ पर्यंत उपलब्ध आहेत. निविदे सोबत रु.२,०००/- ( अक्षरी रु. दोन हजार फक्त ) ची शासकीय पावती जोडणे आवश्यक राहिल.

२. विहित नमुन्यातील प्रपत्रामध्ये व मोहोर बंद असलेली निविदाच स्विकारण्यात येतील.

३. तसेच जर जास्तीत जास्त दर असलेल्या निविदाधारकास यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य विकण्याचे ठरले व त्या नंतरही त्याने सदरील यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य लिलावाची रक्कम भरली नाही अथवा साहित्याची उचल केली नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४. लिलावाची रक्कम भरली जावून लिलाव पूर्ण होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त पंधरा दिवस कोणत्याही निविदाधारकाची अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

५. निविदे सोबत अनामत रक्कम ( EMD ) रु.२०,०००/- ( अक्षरी वीस हजार चा डी.डी. प्राचार्य शासकीय अभियंत्रिकी महाविद्यालय यवतमाळ, यांचे नांवे काढलेला व देय यवतमाळ असलेला ) सोबत जोडण्यात यावा, अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.

६. आपले मोहोरबंद दरपत्रक निविदा या कार्यालयास दि.२८/०४/२०२३ रोजी ५.००वा. पर्यंत जमा करावे. कार्यालयीन दिलेल्या मुदती नंतर प्राप्त झालेले दरपत्रक निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

७. मोहोरबंद निविदा सादर करतांना त्या सोबत भंगार खरेदी बाबतची सक्षम अधिकारीव्दारा प्राधिकृत केलेली व वैध असलेली परवाण्याची ( लायसन्स ) छायांकीत प्रत स्वसाक्षांकीत ( शीक्क्यासह ) करुन जोडावी. सोबत परवाना धारकाचे पॅन कार्ड, आधार कार्ड यांची स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत जोडावी. तसेच मागील तीन आर्थीक वर्षांचा आयकर भरल्याचा सक्षम प्राधीका-याचा सही असणारे प्रमाणपत्र स्वसाक्षांकीत करुन जोडावा.

८. निविदाधारकांना दि.२७/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) एकवेळ जागेवर प्रत्यक्ष यंत्रे, उपकरणे व इतर साहित्यची पाहणी करण्यास परवानगी आहे. त्यांनी संस्थेचे भांडारपाल यांचेशी संस्थेमधे संपर्क साधावा.

९. ज्या खरेदीदाराचे दरपत्रक निविदा मंजुर होईल त्यांनी नमुद संपुर्ण यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य संपूर्ण रकमेचा भरणा करुन स्वयं जावाबदारीवर आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत साहित्य घेवून जाणे बंधनकारक राहिल.

१०. निर्लेखीत झालेले यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य आहे ज्या स्थीतीत आहेत त्या स्थीतीत घेवून जाणे बंधनकारक राहील. तसेच सदरील यंत्रसामग्री फावूंडेशनमधुन काढणे, त्यांचे विद्युत पुरवठा काढुन, वाहनामध्ये ठेवण्याची सर्व जवाबदारी निविदाधारकाची राहील.

११. दरपत्रक निविदा या कार्यालयात दि.२९/०४/२०२३ रोजी स.११.०० वा. उघडण्यात येवून संस्थेने नेमलेल्या अधिका-यांच्या समीती मार्फत निविदांची छाननी करण्यात येईल.



Scanned by CamScanner

११. खरेदीदारास नियमानुसार विक्रीकर व सर्वसाधरण कर त्यांच्या जवाबदारीवर भरावा लागेल.

१२. यंत्रे व उपकरणे यांच्या खरेदीचा लिलावाच्या संपूर्ण रकमेचा भरणा कार्यालयात केल्या नंतरच साहित्य नेण्याची परवानगी देण्यात येईल. रकमेचा भरणा केल्याची शासकीय पावती देण्यात येईल.

१३. लिलावाची योग्य कींमत न आल्यास कींवा ईतर कोणत्याही कारणास्तव संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकार व आवश्यकता वाटल्यास सदर अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार संस्था प्रमुख म्हणजेच प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ यांना राहील.

१४. कोणत्याही कारणास्तव दरपत्रक मंजुर करणे / नाकारणे या बाबतचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकाराकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

१५. विक्रीसाठी असलेल्या यंत्रे, उपकरणे व इतर साहित्य यांची यादी संस्थेच्या संकेतस्थळावर असून त्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | नग |
|---|---|---|
| ०१. | कर्मशाळा विभाग | ४६ नग |
| ०२. | यंत्र अभि. विभाग | ८१ नग |
| ०३. | विद्युत अभि. विभाग | १३१ नग |
| ०४. | स्थापत्य व उपयोजीत यंत्रशास्त्र विभाग | ७५ नग |
| ०५. | अणुविद्युत अभि. विभाग | ०२ नग |
| ०६. | मानव्य व पदार्थ विज्ञान विभाग | ३६ नग |
| ०७. | कार्यालय | ०३ नग |
| ०८. | संगणक अभि. विभाग | ११ नग |

दि.१८/०४/२०२३

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
यवतमाळ.



Scanned by CamScanner